ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख १९ जून, १९५७ अंक १५

## विविध माहिती

**अमेरिकेचें दिवाळें निघालें असतें**—रशियन कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीस मि. क्रुश्चाव्ह फिनलंडला गेले असतांना फिनलंडच्या अध्यक्षांनीं त्यांना असें विचारलें कीं, अमेरिकेकडून श्रोत्यांसाठी टेलिव्हिजनवर आपण जी मुलाखत दिली त्याबद्दल आपणांस काय मोबदला मिळाला. उत्तरादाखल मि. क्रुश्चाव्ह विनोदानें म्हणाले कीं आपण कांहीं घेतलें नाहीं. कारण आपणांस इतकें पाहिजे होतें कीं तें देऊं केल्यास अमेरिकेचें दिवाळें निघालें असतें !

**डिझेल एंजिनांची निर्यात**—भारतांत तयार झालेल्या डिझेल एंजिनांची निर्यात आतां पश्चिम जर्मनींत होऊं लागली आहे. त्याशिवाय विजेचे पंखे, शिवणाचीं यंत्रें, पोलादाचें फर्निचर, इत्यादि माल निर्यात करून भारताच्या एंजिनिअरिंग उद्योगधंद्यांनीं १९५६–५७ सालांत सुमारें ४ कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ मिळविली.

**हिंदी शास्त्रज्ञांना शिक्षण**—अणुशक्तीच्या विज्ञानाचें शिक्षण घेणारे ३४ भारतीय शास्त्रज्ञ निरनिराळ्या देशांत शिक्षण घेत आहेत. सर्वांत अधिक हिंदी शास्त्रज्ञ कॅनडामध्यें शिक्षण घेत आहेत. मुंबई येथील अणुशक्तीची भट्टी कॅनडाच्या साह्यानें उभारण्यांत आली असल्यानें ती चालविण्यास त्यांचा उपयोग होईल.

**लोकसभेचें अधिवेशन**—भारताच्या लोकसभेचें एक अधिवेशन दरवर्षी हैदराबाद अगर दुसऱ्या एखाद्या दक्षिणेंतील शहरांत भरविण्याचा प्रश्न विचार करण्यासारखा आहे, असें मत लोकसभेचे अध्यक्ष श्री. अनंतशयनम् अय्यंगार ह्यांनीं व्यक्त केलें आहे. उत्तर भारत व दक्षिण भारत ह्यांचे संबंध अधिक दृढतर करण्यास त्याचा उपयोग होईल, असेंहि ते म्हणाले.

**पोलंडमधील औद्योगिक प्रदर्शन**—पोलंडमध्यें पोझनान ह्या ठिकाणीं एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनांत भारतासह २९ राष्ट्रांनीं भाग घेतलेला आहे. भारताच्या मंडपांत ग्रामोद्योगाचा माल ठेवण्यांत आला आहे. त्यांतील ग्वाल्हेर, बनारस, इत्यादि शहरांतून तयार झालेल्या रंगीबेरंगी साड्या प्रेक्षकांना फार आवडतात.

**जपानमधील साथ**—जपानमधील इन्फ्ल्युएंझाची साथ सौम्य स्वरूपाची आहे. परंतु तापानें पछाडलेल्या लोकांची संख्या ४ लाखांवर गेली आहे. मोठ्या शहरांतून साथीचा जोर असून हजारों कामगार कामावर गैरहजर आहेत.

**तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें**—भारतानें अमेरिकेकडून तेलावर चालणारीं १०० रेल्वे-एंजिनें घेण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी २० एंजिनांचा पहिला हप्ता येत्या सप्टेंबर महिन्यांत भारतांत येऊन पोंचेल. हीं एंजिनें आल्यावर ईस्टर्न रेल्वेच्या मार्गावर त्यांचा उपयोग करण्यांत येईल.

**सिसेरोचें घर सांपडलें ?**—इतिहासांत प्रसिद्ध असलेला रोमन वक्ता सिसेरो ह्याचें घर आपणांस सांपडलें असल्याचें एका इटालिअन पुराणवस्तुशास्त्रज्ञाचें म्हणणें आहे. खुद्द सिसेरोनें आपल्या घराचें जें वर्णन लिहून ठेवलें आहे, त्या वर्णनाशीं बरोबर जुळणारें असें हें घर आहे असें ते म्हणतात.

**आस्वान् येथील विद्युत्केंद्र**—इजिप्तमधील आस्वान येथें उभारण्यांत येणाऱ्या विद्युत्पादनकेंद्राचें काम एका फ्रेंच कंपनीला देण्यांत आलें होतें. परंतु आतां हें काम करण्याची जबाबदारी पश्चिम जर्मनींतील एका कंपनीवर सोपविण्यांत आली आहे.

**झेकोस्लोव्हाकिआकडून साखरेचे कारखाने**—झेकोस्लोव्हाकिआंतील पूर्वीच्या स्कोडा कारखान्यांत भारतांत उभारण्यासाठी साखरेचे आणखी तीन संपूर्ण कारखाने तयार करण्यांत येत आहेत. त्यांपैकी एक पानिपत येथें, दुसरा मद्रास राज्यांत व तिसरा आसाममध्यें उभारण्यांत येणार आहे. १९४८ पासून झेकोस्लोव्हाकिआनें ५०० साखर कारखान्यांची निर्यात केली आहे.

**गुलमर्ग येथील संशोधन-केंद्र**—गुलमर्ग येथें विश्व-किरणांचें संशोधन करण्यासाठी वेधशाळा उभारण्यांत आली आहे. वेधशाळेंत अत्यंत संस्कारक्षम अशीं उपकरणें आतां बसविण्यांत आलीं आहेत. गुलमर्ग येथील वेधशाळा ८,५०० फूट उंचीवर आहे. अशा प्रकारच्या आणखी १५ वेधशाळा जगांत आहेत.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**अहमदाबादला खेळाचा आखाडा**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें खेळांसाठी एक आखाडा बांधण्याचें ठरविलें आहे. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधण्यांत येणाऱ्या ह्या आखाड्याला २५ लाख रुपये खर्च येणार आहे.

**विमेदारांना सवलत**—ज्या विमेदारांनीं आपली हयातभर हप्ते भरावे लागणारे विमे उतरले असतील त्यांना सवलत देण्याचें आयुर्विमा कॉर्पोरेशननें ठरविलें आहे. अशा विमेदारांना आपल्या वयाच्या ८० व्या वर्षानंतर अगर विम्याचे ३५ पूर्ण वार्षिक हप्ते भरल्यावर आणखी हप्ते भरावे लागणार नाहींत. ह्यांपैकीं जी तारीख उशीरां येत असेल त्या तारखेपासून सवलत दिली जाईल.

**कोचीन बंदराचा उपयोग**—ब्रिटनकडून भारताला १,६०० टन पोलाद मिळणार असून तें जुलैच्या मध्यास भारतांत येईल. पोलाद उतरून घेण्यासाठीं कोचीन येथील बंदराचा प्रथमच उपयोग करून घेण्यांत येईल. कोचीनमधील मजुरांना अधिक रोजगार मिळावा म्हणून ही व्यवस्था करण्यांत येत आहे.

**परदेशीय हुंडणावळ वाचविण्यासाठीं**—परदेशांत जाऊन औषधोपचार करण्यासाठीं भारत सरकार मोकळ्या मुठीनें परदेशीय हुंडणावळ देत असे. पण आतां ज्या रोगांवर देशांत उपचार होऊं शकत नाहीं, अगर केलेले उपचार यशस्वी होत नाहींत, अशाच रोगांसाठीं परदेशीय हुंडणावळीची तरतूद करण्यांत येईल.

**मलायासाठीं हिंदी डॉक्टर्स**—मलायांत काम करण्यासाठीं १२० हिंदी डॉक्टर्सची भरती त्या देशांतील सरकारतर्फे करण्यांत येणार आहे. त्यांपैकीं ३० डॉक्टर्स विशिष्ट रोगांवर उपचार करणारे तज्ज्ञ असतील. सर्व डॉक्टरांना ३ वर्षांच्या करारावर सह्या कराव्या लागतील.

**मध्यप्रदेश फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन** — मध्यप्रदेश राज्याच्या फिनॅन्शिअल कॉर्पोरेशनला १९५६-५७ सालांत २·३५ लाख रुपये निव्वळ नफा झाला. १०,००० रुपये स्टॅट्युटरी रिझर्व्ह फंडांत जमा करण्यांत आले असून ३०,५०० रुपये इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंडांत जमा करण्यांत आले आहेत. ९६,२५२ रु. नफा-वांटणीसाठीं उपयोगांत आणण्यांत येतील.

**कार्यक्रमाची कालमर्यादा वाढवा**—मुंबई शेअरहोल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. श्रॉफ ह्यांनीं असें सुचविलें आहे कीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची कालमर्यादा पांचाऐवजीं सात वर्षांची असावी. त्यामुळें कार्यक्रम अयशस्वी होण्याची भीति नाहींशी होऊन करहि कमी करतां येणें शक्य होईल, असें त्यांचें म्हणणें आहे.

**चित्रपटनिर्मितींत सहकार्य**—१४६६ सालीं ए-निकिटिन नांवाचा एक रशिअन प्रवासी भारतांत येऊन गेला होता. त्याच्या प्रवासवृत्तावर आधारलेला एक चित्रपट भारत व रशिआ सहकार्यानें काढीत आहेत. चित्रपट आतां पुरा होत आला आहे. चित्रपटांत तीन हिंदी कलावंतांनीं कामें केलीं आहेत.

**अफू सेवन करणारांची नोंद**—पंजाब सरकारनें एक हुकूम काढून अफूच्या सेवनाची संवय असणाऱ्या लोकांनीं आपलीं नांवें सरकारच्या अबकारी व कर-खात्याकडे नोंद करावीं असें जाहीर केलें आहे. पुढील आक्टोबरपासून राज्यांत अफूची खुली विक्री बंद करण्यांत येऊन त्याऐवजीं परवान्यांची व वांटपाची पद्धत अंमलांत येणार आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,११,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार टक्के)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

**दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोचले, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, ( ऑ. ट्रेझरर )
श्री. आनंदराव पांडुरंगजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ,,
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ,,
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ,,
श्री. मनोहर रामजी नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# अर्थ

बुधवार, ता. १९ जून, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चीनमध्यें संततिनियमनाला सरकारी मान्यता

जगांतील वाढत्या लोकसंख्येला उदरभरणासाठी पुरेसें अन्न पुरविणें अशक्य होत जाणार आहे ही गोष्ट आतां स्पष्ट झाली आहे. रशिआंत १९१७ ची क्रांति झाल्यानंतर जे कम्युनिस्ट अर्थशास्त्र मान्यता पावलें त्यांत असें प्रतिपादन करण्यांत येत असे कीं, आधुनिक शास्त्रीय शोधांमुळें शेतीसुद्धां सर्व व्यवसायांचें उत्पन्न वाटेल तितकें वाढवितां येईल. अर्थातच, संततिनियमना-सारख्या उपायांची गरज तेथें राहिलेली नाहीं. चीनमध्यें कम्युनिस्ट राजवट स्थापन झाल्यावर तेथील राज्यकर्त्यांनींहि लोकसंख्येच्या वाढीकडे दुर्लक्षच केलें. पण चीनची लोकसंख्या दरसाल १·५ कोटींनीं वाढूं लागल्यावर आतां ह्या प्रश्नाकडे डोळेझाक करता येणें अशक्य झालें आहे. १९५३ सालीं चीनमधील लोकसंख्या ५८·५ कोटी होती. चीनच्या सरकारनें आपल्या धोरणांत आतां उलट दिशेनें बदल केला आहे. लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीनें चीनमध्यें गर्भपात व जनन अशक्य करणाऱ्या शस्त्रक्रिया ह्यांना कायदेशीर मान्यता देण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें संततिनियमनाचा प्रचार व त्यासंबंधीची माहिती लोकांत पसर-विण्यासाठीं चीनच्या आरोग्यखात्यानें खास हुकूम काढला आहे. सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ माल्थस ह्यानें योगक्षेमाच्या साधना-पेक्षा लोकसंख्या अधिक झपाट्यानें वाढत असते असा सिद्धांत मागेंच मांडलेला आहे. त्याच्यानंतर शास्त्रीय शोधांमुळें तो सिद्धांत चुकीचा नाहीं तरी अपुरा आहे असें मानण्यांत येऊं लागलें. पण आतां पुन्हां तो खरा ठरूं पहात आहे.

## करविषयक धोरणाबद्दल प्रतिकूल टीका

इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. एम्. ए. मास्टर ह्यांनीं भारत सरकारच्या करविषयक धोरणाविषयीं नापसंती व्यक्त केली आहे. सुरत चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभासदांपुढें भाषण करतांना ते म्हणाले कीं सध्यांचें करविषयक धोरण असेंच पुढें चालूं ठेवण्यांत आल्यास खाजगी विभागांतील उद्योगधंद्यांना भांडवलाचा संचय करणें अतिशय अवघड जाईल आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील स्पर्धेत ते टिकणार नाहींत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा खर्च भागविण्यासाठीं नवीन कर बसविण्यांत आले आहेत. परंतु त्यामुळें सरकारचा हेतु साध्य होणार नाहीं. भारताच्या अर्थमंत्र्यांनीं ह्यासंबंधीं आपले विचार वेळोवेळीं व्यक्त केलेले आहेत. त्यांचा जास्तींत जास्ती अनुकूल दृष्टिकोनांतून परामर्ष घेतल्यावरसुद्धां असें आढळून येतें कीं भारताला येत्या तीन वर्षांत दरसाल किमान ३०० कोटी रुपये उभारावे लागतील. अर्थातच आणखी जबरदस्त कर बसविण्याशिवाय दुसरा मार्गच शिल्लक राहिलेला नाहीं. म्हणून ही बाब चिंता उत्पन्न करणारी झाली आहे. देशाच्या आर्थिक भरभराटीच्या दृष्टीनें विचार करतां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा काल वाढविणेंच योग्य आहे. भांडवली नफ्यावरील कर, कॉर्पोरेट करांतील वाढ, संपत्तीवरील कर, खर्चावरील कर, इत्यादि नव्या करांमुळें खाजगी उद्योगधंद्यांवर बराच विपरीत परिणाम झाला आहे. सरकारनें संपत्तीवरील कर व खर्चावरील कर मागें घ्यावेत; ते समर्थनीय नाहींत.

## रशिआ अमेरिकेचें अनुकरण करणार

रशिआचे व्यापारमंत्री मि. पॅव्हलॉव्ह ह्यांनीं रशिआंतील आर्थिक परिस्थितीविषयीं कांहीं अनुपलब्ध माहिती पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत सांगितली आहे. रशिआंतील आर्थिक परिस्थितीवर ह्या माहितीनें नवा प्रकाश पडत आहे. मि. पॅव्हलॉव्ह म्हणाले कीं मोटारी, रेफ्रिजिरेटर्स, ह्यासारख्या वस्तू अमेरिकेंत हप्त्यानें विकण्यांत येतात. तशीच पद्धत रशिआंत लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. पण ती नक्की केव्हां सुरू करण्यांत येईल तें सांगतां येत नाहीं. रशिआंत ही पद्धत सुरू केल्यास वस्तू विकत घेण्याच्या लोकांच्या मनोवृत्तींत क्रांति घडून येण्याचा संभव आहे. रोजखपाच्या अनेक प्रकारच्या वस्तू विकण्यासाठीं रशिआंत मोठीं दुकानें आहेत. पण त्यांत इतकी गर्दी असते कीं गिऱ्हाइकांना माल मिळण्यास विलंब लागतो. अशा प्रकारच्या किरकोळ वस्तू विकणारीं यंत्रें अमेरिकेंत वापरण्यांत येतात. रशिआंतहि अशींच २,००,००० यंत्रें बसविण्याचा विचार चालू आहे. रशिआंतील प्रत्येक तीन कुटुंबांत एक सायकल आतां आहे. रशिआंतील मोटारींचें उत्पादन दरसाल ९८,००० आहे. रशिआंतील दुकानांतून गिऱ्हाइकांची गर्दी असते हें खरें. ह्याचें कारण असें आहे कीं प्रत्येक ३५० गिऱ्हाइकांमागें रशिआंत एकच दुकान आहे. अमेरिकेंत ९० गिऱ्हाइकांमागें एक, ब्रिटनमध्यें ८५ गिऱ्हाइकां मागें एक आणि फ्रान्समध्यें ५५ गिऱ्हाइकांमागें एक असें प्रमाण आहे. मोटारी, रेफ्रिजरेटर्स, ह्या वस्तूंप्रमाणें रशिआंत शिवण्याच्या यंत्रांनाहि फार मागणी आहे.

## उत्तेजक गोळ्या खाणारे खेळाडू

अमेरिकन मेडिकल असोसिएशनची वार्षिक सभा न्यूयॉर्क येथें नुकतीच भरली, त्यांत डॉ. बर्जर ह्या 'मादक औषधांच्या तज्ज्ञानें' सांगितलें कीं खेळाडू अधिकाधिक प्रमाणावर उत्तेजक गोळ्यांचा उपयोग करीत आहेत. मैलाची शर्यत चार मिनिटांत पुरी करणाऱ्या सर्वांनीं ह्या गोळ्या खाल्ल्या असलेल्या पाहिजेत, असें ते म्हणाले. 'अम्फीटमाइन' नांवाच्या औषधाचा वेगवेगळ्या नांवाखालीं खप वाढत आहे. बॉक्सर, फुटबॉल पटू, हॉकी पटू व धावण्याच्या शर्यतींत पुढें येणारे हे सर्व ह्या औषधांचें सेवन करतात. अमेरिकेंत त्याच्या सुमारें ६० कोटी गोळ्या तयार करण्यांत येतात. कित्येक प्रमुख खेळाडूंनीं आपण अशा गोळ्या घेत असल्याची कबुली दिली आहे. डॉ. बर्जर ह्यांच्या सल्ल्या-प्रमाणें, अमेरिकन मेडिकल असोसिएशननें एक ठराव मंजूर करून खेळाडूंनीं उत्तेजक औषधांचें सेवन करणें हानिकारक असल्याचें जाहीर केलें आहे व त्या औषधांच्या सेवनाचे बाबतींत अधिक चौकशी करण्याचें ठरविलें आहे.

## धूम्रपान व कॅन्सर ह्यांचा संबंध

धूम्रपान करण्यामुळें कॅन्सर हा रोग होतो किंवा नाहीं ह्या-संबंधीं तज्ज्ञ डॉक्टरमंडळींतहि मतभेद आहेत. अमेरिकन कॅन्सर-सोसायटीनें ह्या विषयासंबंधीं ४ वर्षे अभ्यास चालविला होता. ह्या काळांत संस्थेनें ५० ते ७० वर्षे वयाच्या १,८८,००० लोकांची तपासणी केली. त्यांपैकीं धूम्रपान करणाऱ्या पुरुषांची संख्या सुमारें ६० टक्के होती. बाकीचे पुरुष धूम्रपानापासून अलिप्त होते. ४ वर्षांच्या काळांत ११,८७० लोकांना मृत्यु आला. ह्या तपासणींचा निर्णय म्हणून संस्थेनें आपल्या अहवालांत पुढीलप्रमाणें कांहीं अनुमानें ग्रथित केलीं आहेत. जे लोक नियमितपणें धूम्रपान करतात ते धूम्रपान न करणाऱ्या लोकांपेक्षा फुप्फुसाच्या कॅन्सरनें मरण्याची शक्यता १० पट अधिक असते. त्याशिवाय धूम्रपानाचा परिणाम म्हणून इतर अनेक कारणांनीं अकाली मरण ओढवण्याचा संभवहि वाढतो. ज्या प्रमाणांत सिगारेटस् ओढल्या जातात त्या प्रमाणांत अकाली मरणाचा धोकाहि वाढतो. धूम्रपान करणाऱ्या लोकांत फुप्फुसाच्या कॅन्सरनें मरण येण्याची शक्यता त्यापासून अलिप्त असलेल्या लोकांपेक्षा १,००० टक्क्यांनीं अधिक असते. त्याशिवाय धूम्रपान करणाऱ्या लोकांना घातक ठरणारे हृदयाचे झटके देण्याची शक्यताहि ७० टक्के अधिक असते. हा अहवाल प्रसिद्ध झाल्याबरोबर थोड्याच वेळांत तंबाखूच्या कारखान्यांच्या संशोधन-शाखेनें आपलें पूर्वीचें मत पुन्हां मांडलें: कॅन्सर व हृदयविकार ह्यांचीं अचूक कारणें वैद्यक शास्त्राला अद्याप अज्ञात आहेत, असें हें मत आहे.

## हैड्रोजन बाँबचे प्रायोगिक स्फोट

हैड्रोजन व अणुबाँबचे प्रायोगिक स्फोट बड्या राष्ट्रांनीं स्थगित करावे अशी मागणी भारत सरकार १९५४ पासून करीत आहे. आतां ह्या मागणीला अमेरिकेंत सुद्धां अधिकाधिक पाठिंबा मिळूं लागला असून अमेरिकन सरकार प्रायोगिक स्फोटावर कांहीं मर्यादा घालण्यास तयार होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. अशा प्रकारच्या स्फोटामुळें उत्पन्न होणाऱ्या धोक्याची चवकशी अमेरिकेची काँग्रेस करीत आहे. काँग्रेसपुढें साक्षी देतांना तज्ज्ञांनीं जी माहिती प्रकट केली आहे त्यामुळेंच अमेरिकन सरकारच्या धोरणांत फरक पडला आहे असें सूचित करण्यांत येत आहे. काँग्रेसपुढें अशी माहिती सांगण्यांत आली कीं, १९६० च्या सुमारास सोव्हिएट रशिआचें अणुसामर्थ्य भयानक प्रमाणावर वाढेल. सुमारें २५० हैड्रोजन बॉम्ब्स अमेरिकेवर अचूकपणें टाकून रशिआ हाहाःकार उडवूं शकेल. दुसरें असें कीं, प्रायोगिक स्फोटांमुळें किरणोत्सर्गी धूलीकणांचा जो वर्षाव होतो तो सर्व जगभर पसरला आहे. अशी समजूत होती. पण, आतां असें आढळून आल आहे कीं उत्तर अमेरिका आणि युरोप ह्या भूभागावर हा वर्षाव अधिक प्रमाणांत होतो. पृथ्वीभोंवतालचें हवेचें आवरण दूषित न करणारे बॉम्ब्स तयार करतां येतील असें सांगण्यांत येत होतें. पण ह्याहि बाबतींत अणुतज्ज्ञांनीं विरुद्ध मत व्यक्त केलें आहे. ह्या सर्व कारणांमुळें मनुष्यजातीचें भवितव्य अंधःकारमय करणारे हे स्फोट बंद नाहीं तरी निदान स्थगित करण्यांत बड्या राष्ट्रांनाहि आस्था वाटूं लागली आहे असें दिसतें.

## 'निर्गत-विभूषण' कारखानदार

निर्गतीचे कामीं मोठी कामगिरी बजावणाऱ्या कारखानदाराचा सरकारनें योग्य रीतीनें मान करावा, अशी सूचना श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीं निर्गत सल्लागारमंडळींतील आपल्या भाषणांत केली. अशा मानचिन्हांमुळें निर्गत व्यापाराच्या महत्त्वास प्रसिद्धि मिळेल, असें ते म्हणाले.

## आशिआमधील पोलादाचें उत्पादन

संयुक्तराष्ट्र संघटनेनें आशिया व अतिपूर्वेकडील देशांसाठीं एक इकॉनॉमिक कमिशन स्थापन केलेलें आहे. ह्या कमिशनच्या लोखंड व पोलाद-विषयक उपसमितीची बैठक सयाममधील बँकॉक ह्या शहरीं एक आठवडापर्यंत चालली होती. आशिआंतील राष्ट्रांतून लोखंड व पोलाद तयार करण्याच्या धंद्याची जी वाढ करण्यांत येत आहे, तीबद्दल बैठकीला आलेल्या प्रतिनिधींनीं समाधान व्यक्त केलें आणि ह्या धंद्याचें भवितव्य आशादायक आहे असें मत प्रकट केलें. आशिआंतील लोखंड व पोलादाच्या धंद्याचा अधिक विकास करण्यासाठीं आशिआंतील तज्ज्ञ प्रगत देशांत पाठवून शिकवून आणावे असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला. तज्ज्ञांना शिकविण्याचें कार्य संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत करण्यांत यावें आणि त्यांना बेल्जम, फ्रान्स, पश्चिम जर्मनी व ब्रिटन ह्या देशांतून पाठविण्यांत यावें असें ठरविण्यांत आलें. आशिआंतील देशांतून पोलादापासून अनेक वस्तु तयार करणाऱ्या मध्यम आकाराच्या कारखान्यांवर भर देण्यांत यावा अशीहि शिफारस करण्यांत आली. सायकली, शेतीचीं अवजारें, हातकंदील, शिवण्याचीं यंत्रें, छोटीं यांत्रिक हत्यारें, विजेचे पंखे, पंप, इत्यादि प्रकारच्या वस्तू बनविणाऱ्या कारखान्यांकडे विशेष लक्ष देण्यांत यावें असें सुचविण्यांत आलें. सध्यां लोणारी कोळशाचा उपयोग करून लोखंड बनविणाऱ्या भट्ट्या स्थापन करण्याची एक सूचना करण्यांत आली आहे. सुमारें ७० वर्षांपूर्वी अमेरिकेंतील जवळजवळ सर्व बिडाचें लोखंड अशाच भट्ट्यांतून तयार होत असे.

---

## कांहीं कॉफीगृहें बंद होणार; कमी वेळ उघडी राहणार

इंडिया कॉफी बोर्डानें ११२ कनिष्ठ नोकरांवर बडतर्फीची नोटीस बजावली आहे. आग्रा, सिमला व गुंटूर येथाल कॉफीगृहें बंद करण्यांत येणार आहेत. बंगलोरमधील कॉफीगृहांपैकीं एक बंद केलें जाईल. सध्यां कॉफीगृहें १२ तास उघडीं असतात, तीं ८ तासच उघडीं ठेवण्यांत येतील.

---

**नोकरीवर कायम होण्यासाठीं**—बिहार सरकारनें असा हुकूम काढला आहे कीं, बिहार सिव्हिल सर्व्हिसमध्यें कायम होण्यासाठीं पोहता येत असणें आवश्यक आहे. ५० वर्षांखालील कोणाहि सरकारी नोकराला ह्या अटीपासून मुक्तता देण्यांत येणार नाहीं. पूर आल्यावर काम करण्यासाठीं बऱ्याच नोकरांना जावें लागतें, म्हणून ही अट घातली आहे.

---


# DECCAN INSTITUTE OF COMMERCE

**594, Budhawar Peth, Poona 2.**

Opens for the 1957-58 session on Friday the 21st June 1957. Students coached up for G. C. D., L. C. C., G. D. C. & A., C. A. I. I. B., D. Com., A. C. W. A., Shorthand, Typewriting. Morning and evening Classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-Graduates and Graduates.

Prospectus free on application to the Principal.

## बँककचेऱ्यांतून यांत्रिक मेंदूचा उपयोग

### अणुयुगांतील बँकिंग

बँकांचे व्यवस्थासर्च वाढत आहेत आणि नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेवरील अवलंबनहि वाढत चाललें आहे. बँकांच्या रोजच्या व्यवहारांसाठी अधिकाधिक यंत्रें वापरण्यांत येऊं लागलीं आहेत. जेथें खातीं पुष्कळ, व्यवहाराची संख्या मोठी, व्यवसायाचें स्वरूप प्रचंड, तेथेंच यांत्रिकीकरण परवडणार हें उघड आहे. लहान कचेऱ्यांतून तें महाग व अनवश्यकच ठरणार. आपल्याइकडे टाइपरायटरच्या पलीकडे यांत्रिकीकरण फारसें गेलेलें नाहीं; कांहीं मोठ्या ठिकाणीं फक्त बेरजा–वजाबाक्या करणारीं यंत्रें बसविण्यांत आलेलीं आहेत.

कांहीं महिन्यांपूर्वी लंडनमधील बँकांनीं नेमलेल्या एका कमिटीनें बँकिंगमध्यें इलेक्ट्रॉनिक्सचा म्हणजे यांत्रिक मेंदूचा कितपत उपयोग करतां येईल, ह्याचा विचार केला. यांत्रिकीकरणाच्या नेहेमींच्या पद्धतीचा अवलंब तेथील बँकांनीं ह्यापूर्वीच केलेला आहे.

यांत्रिक मेंदू सूचनांप्रमाणें बिनचुक काम करतो, परंतु अनपेक्षित किंवा बिनमाहितीचा प्रश्न आला, कीं तो बिचकतो. बँकांच्या रोजच्या व्यवहारांसाठी नेमका कोणत्या प्रकारचा यांत्रिक मेंदू बनविला पाहिजे, हें योजण्याचें काम त्याच्याविषयक कारखानदारांचें आहे. परंतु, किती बँका यांत्रिक मेंदूचा वापर करण्यास तयार होतील, ह्यावर बरेंच अवलंबून आहे. सर्व बँकांचें सहकार्य झालें व त्यांनीं प्रायोगिक योजनेस पाठिंबा दिला, तर तो युगकारक ठरेल. बँकिंग व्यवसायांतील सर्वांत महत्त्वाचा दस्त म्हणजे चेक हा होय आणि त्यावरच यांत्रिक मेंदूची रचना आधारावी लागेल, हें उघड आहे. यांत्रिक मेंदूच्या शिस्तीसाठी, सर्व बँकांच्या चेकवरील मॅग्नेटिक शाईनें छापलेलीं अक्षरें असावीं लागतील. एवढें किमान सहकार्य झालें म्हणजे व्यक्तिगत बँकांनीं यांत्रिक मेंदूची सामुग्री आजच वापरली किंवा न वापरली तरी इतर बँकांच्या तें आड येणार नाहीं.

(१) चेक बँकवार व शाखावार वेगळे काढणें, (२) खातेदारांच्या खात्यावर रक्कम चढवणें किंवा खात्याला नांवें टाकणें आणि (३) मध्यवर्ती ठिकाणीं हिशेबांचें केंद्रीकरण करणें, ह्या तीन बाबतींत यांत्रिक मेंदूला पुष्कळच काम उरकतां येण्याजोगें आहे.

दररोज बँकेकडे चेकसर्चीं बंडलें येतात, त्यांत तिच्या खातेदारांनीं इतर बँकांच्या खातेदारांचे नांवानें दिलेले चेक असतात. हे चेक बँकेकडे वटवण्याकरितां इतर बँकांनीं धाडलेले असतात. ज्या शाखेवर ते काढलेले असतात, तिचेकडे ते पाठवावे लागतात. शेंकडों शाखा असणाऱ्या बँकांत करावें लागणारें हें काम कंटाळवाणें असतें, व त्यासाठी सर्व बँकांत मिळून शेंकडों कारकून बसवावे लागतात. ग्रेटब्रिटनमध्यें बँकांच्या सुमारें १०,००० शाखा आहेत व दररोज सुमारें २० ते ३० लक्ष चेकसची वरील पद्धतीनें व्यवस्था लावावी लागते.

हें काम यांत्रिक मेंदूकडे सोंपवावयाचें, म्हणजे प्रत्येक चेकवरील नंबर आणि ज्या कचेरीवर चेक काढलेला असेल त्याचा निदर्शक नंबर एका ठराविक ठिकाणीं मॅग्नेटिक शाईनें छापावा लागेल. (खात्यावर रक्कम नांवें पडावयाची आहे हें दर्शविणारें एक चिन्ह व खातेदाराच्या खात्याचा नंबर, हींहि चेकवर छापलेलीं असावीं लागतील.) मॅग्नेटिक शाईचें हें लिखाण वाचतां येणारा यांत्रिक मेंदू प्रत्येक शाखेच्या वेगळ्या कप्प्यांत चेक टाकण्याचें काम बिनचूक करील. शेंकडों शाखांच्या कप्प्यांचें यंत्र बनविणें फार खर्चाचें होईल; म्हणून कमी कप्प्यांच्या यंत्रानेंहि काम भागवतां येईल; सॉर्टिंगच्या क्रिया वाढतील एवढेंच.

यांत्रिक मेंदूकडून हिशेब लिहून घेणें ज्यास्त अवघड जाईल. यंत्र बनविणें कठीण गेलें, तरी त्याच्याकडून कामें कशीं करून घ्यावीं लागतील, हें कमिटीनें सुचविलें आहे. ह्या मेंदूला स्मरणशक्ति अधिक लागेल; कारण चेक भरला जाणें, तो पेईंग बँकांकडे क्लिअरिंग द्वारां जाणें, पेईंग बँकांच्या मग तो शाखांकडे जाणें, योग्य त्या खात्यांतून रक्कम वजा होणें, ह्या सर्वांसाठी वापरलेल्या चिन्हांचें नेहेमींच्या आकड्यांत रूपांतर करणें, हीं कामें यांत्रिक मेंदूकडून करून घेण्यासाठी योजना आंखणें जरूरीचें होईल. हिशेबांचें केंद्रीकरण ही त्यापुढची पायरी असेल. कांहीं शाखांच्या गटासाठी मिळून मध्यवर्ती कचेरी असेल, तर तिचें व शाखांचें माहितीचें दळणवळण चालूं रहावें ह्यासाठी संदेश पाठविण्याकरितां रेडिओ यंत्रें वापरावीं लागतील.

ह्या सर्व गोष्टी अंमलांत आल्या, तर बँकिंगच्या व्यवहारांत दूरगामी फरक घडून येतील. ज्या कारखानदारांना, नेमक्या ठिकाणीं अस्त्रांचा स्फोट करविण्यासाठी मार्गदर्शक मेंदू त्यांत बसविता आले, त्यांना वरील योजनांचीं यंत्रें बनविणें अगदीं सोपें आहे. चेकचा कागद यंत्रांतून काढला–घातला जाईल, ह्यासाठी तो मजबूत असावा लागेल; त्याचेवर मॅग्नेटिक शाईमधील भाषा 'मेंदू'ला वाचतां आली पाहिजे. यांत्रिक मेंदूला सर्वच कामाचा एकदम ताण न देतां, हळूहळू कामें वाढवत नेतां येतील. उदाहरणार्थ, चेकसच्या सॉर्टिंगपासून प्रारंभ करता येईल. मॅग्नेटिंग शाईच्या ऐवजीं साधी शाई असली, तरी फोटो-इलेक्ट्रिक इंद्रियांना त्या शाईतील अक्षरें वाचतां येतील, ही पुढची सुधारणा असेल. ह्या सर्व बाबतींत बँकांनीं सहकार्यानें संशोधनास व प्रयोगांस साहाय्य केलें पाहिजे. अणुशक्तीनें जगांत इतरत्र कामें होत असतांना आपण अजून बैलगाडीच वापरति आहों आणि हातकताईस उत्तेजन देत आहों; अणुशक्तीविषयीं आपण फक्त ऐकावयाचें, अशीच आज परिस्थिति आहे. बँकांतील यांत्रिक मेंदूबद्दलहि तसेंच म्हणण्याची पाळी येईल.

---

### मॉस्को येथील 'होटेल युक्रेनिया'

मॉस्को येथें "होटेल युक्रेनिया" हें होटेल नुकतेंच उघडण्यांत आलें. त्या होटेलांत १०२६ खोल्या असून प्रत्येक खोलींत रेडिओ व टेलिव्हिजन सेट आहे. १२व्या मजल्यावर एक रेस्टॉरंट आहे, तेथून मॉस्को शहराचा सुंदर देखावा दिसतो.

---

### संत तुकारामाच्या अभंगांचें फ्रेंच भाषांतर

संत तुकारामाच्या अभंगांचें फ्रेंच भाषांतर 'युनेस्को' तर्फे १९५८ मध्यें प्रसिद्ध होणार आहे.

---

### नव्या नाण्यांचा प्रसार

१५ मे अखेर ६८ कोटी नवीं नाणीं प्रचारांत आलीं आहेत. सरकारच्या तीन टांकसाळींत मिळून दररोज ३५ लक्ष नवीं नाणीं तयार होत आहेत.

---

### १० विदेशीयांना भारताचें नागरिकत्व नाकारलें

भारताचें नागरिकत्व आतांपर्यंत १० विदेशीयांना नाकारण्यांत आलें आहे. नागरिकत्व मागणारे ५६ अर्ज आले होते.

## मजरे कावे सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गाच्या परीक्षेचा निकाल

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट को-ऑप्. बोर्ड लि. संस्थेच्या विद्यमानें मे, १९५७ मध्यें घेण्यांत आलेल्या सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्गाच्या परीक्षेचा निकाल लागलेला असून निकाल शें. ४८ टक्के लागलेला आहे. परीक्षेस २७ उमेदवार बसले होते, त्यांपैकी १३ उमेदवार उत्तीर्ण झालेले आहेत सदरहू वर्गाचे शिक्षक श्री. डी. बी. निकम को-ऑप्. ट्रेनिंग इन्स्पेक्टर व श्री. आर. एन्. पागे ॲडि. को-ऑप्. ट्रेनिंग इन्स्पेक्टर कोल्हापूर हे होते.

### दुसरा वर्ग

( १ ) श्री. कल्लामा भिकू पाटील, ( २ ) श्री. सेमाणा इराप्पा चव्हाण, ( ३ ) श्री. गावडू रामचंद्र पाटील.

### पास वर्ग

( १ ) श्री निंगाप्पा परशराम पाटील, ( २ ) श्री. लक्ष्मण जोतीबा बसरकट्टी, ( ३ ) श्री. लक्ष्मण गुणाप्पा चांदीलकर, ( ४ ) श्री. लक्ष्मण नाना वेनके, ( ५ ) श्री. श्रीपाद गोविंद राजाध्यक्ष, ( ६ ) शंकर पांडुरंग आबदण, ( ७ ) श्री. गोपाळ विठोबा तुपारे, ( ८ ) श्री. रामा नागोबा नाईक, ( ९ ) श्री. घापलू रामचंद्र घामणेकर, ( १० ) श्री. बाळोबा सुबराव पाटील.

---

**सुएझच्या कालव्याची सुधारणा**—सुएझच्या कालव्यांतील अडथळे दूर करणाऱ्या तज्ज्ञांचे प्रमुख जनरल रेमंड व्हीलर ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं सुएझमधील वहातूक सुरळीत चालविण्याची व त्याची सुधारणा करण्याची पात्रता इजिप्तच्या तंत्रज्ञांच्या ठिकाणीं आहे. कारण, त्यांचें शिक्षण ब्रिटन व अमेरिकेंत झालेलें आहे.

**ग्रामोद्योगाचें केंद्र**—केरळच्या सरकारनें बांबू व वेत ह्यांच्यापासून उपयुक्त वस्तू बनविण्याचें एक केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. केंद्रासाठी २१,००० रुपये खर्च येईल. केरळमधील 'कोरवा' नांवाची एक मागासलेली जमात हा व्यवसाय करते. जमातीमधील लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठी केंद्र स्थापन करण्यांत येत आहे.

**रशिआंतील कामाचे तास**—१९६० च्या सुमारास रशिआंत सर्व कामगारांचे कामाचे रोजचे तास ७ करण्यांत येणार आहेत. चालू वर्षाच्या दुसऱ्या सहामाहींत पोलादाच्या कारखान्यांतील कामगारांचे कामाचे तास ७ करण्यांत येतील व खाणींतील कामगारांचे तास ६॥ करण्यांत येतील.

**केरळमधील उद्योगधंदे**— केरळच्या सरकारनें खाजगी उद्योगपतींना उद्योगधंदे स्थापन करण्यास उत्तेजन देण्याचें धोरण स्वीकारलें आहे. राज्यांतील उद्योगधंद्यांच्या विकासाचीं बोलणीं करण्यासाठी श्री एम्. पी. बिर्ला हे उद्योगपति त्रिवेंद्रमला गेले होते.

**कलकत्त्यांतील कारखान्यांकडे मागणी**—कलकत्त्यामधील तीन कारखान्याकडे रेल्वेच्या उपयोगाची सामुग्री तयार करण्याची मागणी रेल्वेबोर्डानें नोंदविली आहे. सर्व सामुग्रीची मिळून किंमत सुमारें ३·२५ कोटी रुपये होईल. रेल्वेचे डबे बांधण्यासाठीं लागणारी कांहीं सामुग्री हे कारखाने पुरविणार आहेत.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एस्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.






## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## १९५६ मधील खनिजांचें उत्पादन

### नवा उच्चांक

भारतांतील खनिजांच्या उत्पादनानें १९५६ मध्यें नवा उच्चांक गांठला. खनिजांच्या उत्पादनाची एकूण किंमत ११६·४ कोटी रुपये झाली. त्यामागील वर्षांच्या किंमतीपेक्षा ती १०·८ कोटी रुपयांनीं ( १० टक्क्यांनीं ) जास्त होती.

### कोळसा

खनिज पदार्थांत सर्वांत अधिक म्हणजे ३९·४ दशलक्ष टन उत्पादन कोळशाचें झालें. त्यामुळें खनिजांच्या उत्पादन किंमतींत विशेष वाढ झाली. कोळशाची किंमत ५७·६ कोटी रुपये झाली. १९५५ मधील उत्पादनापेक्षा या वर्षींचें कोळशाचें उत्पादन १·२ दशलक्ष टनांनीं अधिक झालें.

### इतर खनिजें

त्या खालोखाल महत्त्वाचे इतर खनिज पदार्थ म्हणजे अशुद्ध मँगेनीज ( २४·७ कोटी रु. ), अभ्रक ( ७·७ कोटी रु. ), सोनें ( ५·८ कोटी रु. ), मीठ ( ५·८ कोटी रु. ), अशुद्ध लोखंड ( ३·९ कोटी रु. ), चुनखडी ( ३·३ कोटी रु. ) व अशुद्ध तांबें ( ३ कोटी रु. ) हे होत.

धातुयुक्त खनिजांची १९५६ मधील उत्पादनाची किंमत ४० कोटी रु. होती. १९५५ मध्यें ती ३१·८ कोटी रुपये होती.

लोखंड आणि अशुद्ध मँगेनीज यांचें उत्पादन, लोखंड व पोलाद यांसाठी ठरविलेल्या विस्तारकार्यक्रमानुसार चालू असून, अशुद्ध लोखंडास तर परकीय बाजारपेठांतून चांगली मागणी आहे. १९५६ मध्यें परदेशांकडे १६,९१,६२६ टन अशुद्ध लोखंड रवाना करण्यांत आलें.

### धातूंचा अंश नसलेलीं खनिजें

सदर वर्षांत धातूचा अंश नसलेल्या खनिजांतहि सर्वांगीण सुधारणा दिसून आली. १९५६ मध्यें अभ्रकाचें उत्पादन ४,३७,००० हंड्रेडवेट झालें. सदर वर्षांतहि या खनिजास परदेशांत चांगली मागणी ( ४,८४,६६४ हं. ) होती. त्यामागील वर्षापेक्षा किंमत आणि उठाव या दोन्ही दृष्टीनें या खनिजांचे बाबतींत सदर वर्ष चांगलें ठरलें. जिप्समच्या उत्पादनांतहि वाढ झाली.

१९५६ मध्यें मीठ उत्पादन ३१,७४,००० टन होऊन १९५३ मधील उत्पादनाचा उच्चांक मोडला गेला. १९५५ मधील उत्पादनापेक्षा तें ३,५२,००० टनांनीं जास्त झालें.

धातूचा अंश नसलेल्या खनिजांच्या सदर वर्षांतील उत्पादनाची एकूण किंमत १४·७ कोटी रुपये होती. १९५५ मध्यें ती १४·१ कोटी रुपये होती.

### बांधकाम साहित्याचें उत्पादन

चुनखडी, रेती, दगड, यांसारख्या बांधकाम साहित्याच्या १९५६ मधील उत्पादनाची किंमत ४ कोटी रुपये होती. १९५५ मध्यें ३·६ कोटी रुपये अशी होती.

---

**केरळ राज्यासाठी तांदूळ** — आंध्र किसान-सभेच्या चिटणिसांनीं आंध्र राज्यांतील शेतकऱ्यांतर्फे केरळच्या राज्याला १,००,००० टन तांदूळ पुरविण्याची तयारी दाखविली आहे. केरळ राज्यांतील लोक मुख्यतः तांदुळावरच आपली गुजराण करतात. पण राज्यांतील तांदुळाचें उत्पादन अपुरें असल्यामुळें बाहेरून तांदळाची आयात करावी लागते.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लक्ष्मी रोड, पुणें शहर.

स्थापना : ४ सप्टेंबर, १९१७

दिनांक १ जानेवारी १९५७ पासून कायम ठेवींचे व्याजाचे दर वाढविले आहेत.

| मुदत | पूर्वींचा दर | नवा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | २ | २½ टक्के |
| २ वर्षें | २½ | २¾ टक्के |
| ३ वर्षें | — | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३ | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ | ४ टक्के |

या बँकेंतील ठेवी मुख्यतः सहकारी शेतकी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठीच वापरल्या जातात.

अधिक माहिती पत्रद्वारें अगर समक्ष आनंदानें पुरवूं.

बा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल
भागीदारांतर्फे रु. ३५,२३,७००
मुंबई सरकारतर्फे रु. २६,००,०००
रु. ६१,२३,७००

गंगाजळी व फंड रु. ६१,८३,९००
ठेवी रु. १०,७९,८८,०००
खेळतें भांडवल रु. १३,३५,२४,०००

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## कोपरगांव सहकारी साखरकारखाना

### हंगामांत १,७०,१५० पोतीं साखर तयार केली

दि. ३१ मे, १९५७ रोजीं सकाळीं कोपरगांव सहकारी साखरकारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गुलाबराव बी. देशमुख यांनीं विधीपूर्वक कारखान्याचें चालू मोसमाचें काम थांबविलें. यंदाचा संपूर्ण असा पहिलाच हंगाम कारखान्याचा असून त्यामध्यें त्यानें अपेक्षेबाहेर यश मिळविलें आहे. एकूण १,५२,५८८ टन ऊंस चालू मोसमांत गाळण्यांत आला व त्यापासून १,७०,१५० पोतीं साखर तयार झाली. साखरेची प्रत बाजारांत इतकी उत्तम ठरली कीं मुंबईमध्यें तिला सर्वांत जास्त भावानें मागणी झाली.

कोपरगांव सहकारी साखरकारखान्याचे ८४८ सभासद असून त्यांचे उसाचें क्षेत्र ३८७४ एकर आहे. वसूल झालेलें भांडवल २५,९१,३३१ रु. असून सरकारनें १० लाख रु. व इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशननें ४० लाख रुपये कारखान्यासाठीं कर्ज म्हणून दिलें आहे. कारखाना फेब्रुवारी, १९५६ मध्यें सुरू झाला व गेल्या वर्षी मिळालेल्या अर्ध्या हंगामांत ५६,००० पोतीं साखर त्यांत तयार झाली.

प्रवरानगर सहकारी साखरकारखान्यानेंहि यंदाचे हंगामांत नवीन मशीनरींचे साहाय्यानें १,८९,००० पोतीं साखर तयार केली आहे.

## को-आपरेटिव्ह ट्रेनिंग स्कूल

सहकारी ट्रेनिंगचें शिक्षण व प्रचारासंबंधीची योजना एप्रिल १९५७ पासून आणखी एक वर्षाकरतां चालू ठेवण्यास मुंबई सरकारनें मंजुरी दिली आहे. विदर्भ, सौराष्ट्र, कच्छ आणि मराठवाडा हे विभाग धरून सध्यांच्या सबंध मुंबई राज्याला ही योजना लागूं होईल.

## परदेशांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन

स्वतःच्या खर्चानें परदेशांत प्रगत अध्ययनासाठी वा प्रत्यक्ष शिक्षणाकरितां जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संस्कृति व दैनंदिन प्रश्नासंबंधीं ह्या देशाचा इतिहास तपशीलवार माहिती देणारी एक पुस्तिका सरकारनें प्रकाशित केली आहे. इंग्लंड, अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इत्यादि देशांतील विद्यापीठांत व इतर संस्थांत प्रवेश घेण्यासाठी कसा अर्ज करावा, अध्ययनासाठी व राहण्यासाठी खर्च किती येईल, परकीय हुंडणावळीची व्यवस्था, पासपोर्ट, व्हिसा, इत्यादिसंबंधीं तपशीलवार माहिती या पुस्तिकेंत देण्यांत आली आहे.

ही पुस्तिका असिस्टंट एज्युकेशन ॲडव्हायसर, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन ॲण्ड सायंटिफिक रिसर्च, ३१ थिएटर कम्युनिकेशन बिल्डिंग, कॉनॉट सर्कस, न्यू दिल्ली ७, यांजकडून मिळूं शकेल.

## मुंबई कूळकायद्यांत दुरुस्ती

१९५६ च्या मुंबई कूळ वहिवाट आणि शेतजमीन विषयक कायद्यामध्यें दुरुस्ती करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. सदरहू दुरुस्त्यांचा मसुदा मुंबई सरकारच्या ४ जून १९५७ च्या खास गॅझेटच्या भाग ४ ब मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला आहे. या दुरुस्त्यांसंबंधीं जर कुणाला कांहीं हरकती किंवा सूचना करावयाच्या असतील तर त्या मुंबई सरकारचे महसूल खात्याचे सेक्रेटरी, सचिवालय, मुंबई-१ या पत्त्यावर तारीख २० जून १९५७ पर्यंत पोंचल्या पाहिजेत.


**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक :-श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**સુખી જીવનની પગદંડી**
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખક:—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***
( शिड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ )
मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.